सारखळी खु. येथे जल अर्पण दिवस उत्साहात साजरा >>पान 2

ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत विजेत्या भारतीय संघाचे केंद्रिय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले स्वागत >>पान 3

अमेरिका-इराण युद्धाचा पारले-जी बिस्किटांनाही फटका, उत्पादन ठप्प; ५२५ कामगारांवर टांगती तलवार! >>पान 4

**सुविचार**

यशस्वी मनुष्य होण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा उपयुक्त मनुष्य होण्याचा प्रयत्न करा.– अल्बर्ट आइनस्टाइन

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 218 ■ बुधवार, दि. 18 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मृणाल ठाकूरनं घेतलं पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दर्शन...

आतील पान

## अफगाणिस्तानवरील हल्ल्याचा भारताकडून तीव्र निषेध

काबुल : अफगाणिस्तानमधील काबूल येथील रुग्णालयावर पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यात ४०० जणांचा मृत्यू झाला. भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानचा तीव्र शब्दात निषेध केला असून सामान्य नागरिकांना लक्ष्य करणारे हे भ्याड आणि अक्षम्य कृत्य असल्याची टिप्पणी केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने एक्सवर शेअर केलेल्या निवेदनात म्हटले, ''काबूलमधील ओमिद व्यसनमुक्ती उपचार रुग्णालयावर पाकिस्तानने केलेल्या अमानुष हवाई हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. हे एक भ्याड आणि अमानवीय हिंसक कृत्य आहे.''


पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यामुळे शेकडो निरपराध लोकांचा बळी गेला. ''लष्करी कारवाई म्हणून या कृत्याला कोणत्याही परिस्थितीत समर्थन देता येणार नाही. पाकिस्तान आता या हत्याकांडाला लष्करी कारवाईचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करत आहे'', असा आरोप परराष्ट्र मंत्रालयाने केला.

पाकिस्तानचे हे घृणास्पद आणि आक्रमक कृत्य अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वावरील एक उघड हल्ला असून प्रादेशिक शांतता व स्थिरतेला थेट धोका आहे, असेही परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले.

रमजानच्या पवित्र महिन्यात हल्ला झाल्यामुळे भारताने यावर जोरदार टीका केली आहे. ''जगभरातील मुस्लिम समुदायासाठी हा महिना शांतता, चिंतन आणि दयेचा काळ असल्याचे मानले जाते. रमजानच्या पवित्र महिन्यात हा हल्ला झाल्यामुळे ही बाब या कृत्याला अधिकच निंदनीय बनवते. कोणताही धर्म, कोणताही कायदा आणि कोणतीही नैतिकता रुग्णालयाला आणि तेथील रुग्णांना हेतुपुरस्सर लक्ष्य करण्याचे समर्थन करू शकत नाही'', असे या निवेदनात म्हटले आहे.

भारताच्या परराष्ट्र विभागाने दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले, ''आंतरराष्ट्रीय समुदायाने हे गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. पाकिस्तानकडून अफगाणिस्तानातील नागरिकांना लक्ष्य करण्याची ही निष्कारण मोहीम लवकरात लवकर थांबेल, यासाठी प्रयत्न करायला हवेत. या हल्ल्यात बळी पडलेल्या शोकाकुल कुटुंबांप्रति भारत शोकसंवेदना व्यक्त करतो. जखमींना लवकरात लवकर बरे वाटावे, या सदिच्छा व्यक्त करतो. भारत नेहमीच अफगाणिस्तानच्या लोकांसोबत खंबीरपणे उभा आहे. अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेसाठी भारताचे नेहमीच समर्थन असेल.'





'पाकिस्तानने व्यसनमुक्ती केंद्राला लक्ष्य करून ४०० जणांचा बळी घेतला तर २५० हून अधिक लोक जखमी झाल्याची प्रतिक्रिया तालिबानच्या प्रवक्त्यांनी दिली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या कार्यालयाचे प्रवक्ते मोशर्रफ जैदी यांनी अफगाणिस्तानचे आरोप निराधार आणि बिनबुडाचे आहेत, असे म्हटले आहे. पाकिस्तानने जो एअर स्ट्राईक केला तो अचूक होता. आम्ही तिथल्या लष्करी तळांवर आणि दहशतवादी मोड्युलवर हल्ला केला, आम्ही सामान्य लोक जिथे राहतात तिथे कुणालाही लक्ष्य केले नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## राज्यातील शालेय पोषण आहार पुरवठ्यातील तक्रारींची सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत चौकशी - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरवल्या जाणाऱ्या हिरवा वाटाणा ऐवजी पांढरा वाटाणा पुरवला जात असल्याची चौकशी सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांकडून करणार आहोत. चौकशीचा अहवाल प्राप्त होताच दोषींवर नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे विधानसभेत स्पष्ट केले. आमदार कैलास घाडगे पाटील यांनी याबाबत लक्षवेधी उपस्थित केली होती.

**दोषींवर कठोर कारवाई करणार**



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरवल्या जाणारा आहार हा विद्यार्थ्यांना सकस मिळावा यासाठी शासनाकडून दर निश्चित करण्यात आलेले आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या आणि बाजार समितीमधील धान्याचे चालू दर विचारात घेऊनच निविदा काढली जाते, असे मंत्री भुसे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, ''निविदा निश्चित करण्यापूर्वी अन्नाचे नमुने घेतले जातात आणि त्यांची प्रमाणित लॅबमध्ये तपासणी केली जाते. हा माल दर दोन महिन्यांनी शाळांना पुरवला जातो.''

या प्रश्नाच्या चर्चेत आमदार रमेश बोरनारे, डॉ. नितीन राऊत यांनी सहभाग घेतला.

## तब्बल ४६,५०० मेट्रिक टनहुन अधिक एलपीजी घेऊन 'नंदा देवी' जहाज भारतात दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'शिवालिक'नंतर आणखी एक एलपीजी टँकर भारतात दाखल झाला आहे. 'नंदा देवी' हे जहाज आज म्हणजेच मंगळवार १७ मार्च रोजी भारतात झालं आहे. या टँकरमध्ये ४६ हजार ५०० मेट्रिक टनांहून अधिक द्रवित पेट्रोलियम वायू म्हणजेच एलपीजी आहे. अँकरेजवर याची शिप-टू-शिप ट्रान्सफर प्रक्रिया केली जाणार आहे.

दीनदयाल पोर्ट प्राधिकरण (डीपीए) चे अध्यक्ष सुशील कुमार सिंह यांनी 'एमटी नंदा देवी' या मदर व्हेसलच्या कॅप्टन आणि क्रूशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी जहाजाला भेट दिली. हे जहाज युद्धग्रस्त होर्मुज सामुद्रधुनी पार करून वाडिनार बंदर, गुजरात येथे पोहोचले. मध्य-पूर्वेतील वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर होर्मुज सामुद्रधुनीतून प्रवास करणारे हे भारताचे दुसरे जहाज ठरले आहे.

यापूर्वी एक दिवस आधी 'शिवालिक' हा एलपीजी टँकर मुंद्रा बंदर, गुजरात येथे ४६ हजार मेट्रिक टनांहून अधिक एलपीजी घेऊन पोहोचला होता. या टँकरमधील गॅस भारतातील घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलो वजनाच्या सुमारे ३२.४ लाख मानक घरगुती सिलेंडर इतका होता.

## दिल्लीच्या राष्ट्रीय रक्षा महाविद्यालय शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

### शिष्टमंडळात रशिया, टांझानिया, नायजेरिया, नेपाळ, ओमान आणि इंडोनेशियाचे सैन्य अधिकारी



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिल्लीस्थित राष्ट्रीय सुरक्षा महाविद्यालयाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान भवन येथे भेट घेतली. शिष्टमंडळात रशिया, ओमान, नायजेरिया, नेपाळ, इंडोनेशिया, टांझानिया या देशांमधील भूदल, नौदल आणि वायुदलातील सैन्य अधिकाऱ्यांचा समावेश होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी शिष्टमंडळाला महाराष्ट्रात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली. तसेच महाराष्ट्राची वेगाने वाटचाल करणारी अर्थव्यवस्था, सक्षम सागरी सुरक्षा, संपर्क यंत्रणा, तसेच राज्यात मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या गुंतवणुकीची यशोगाथा सांगितली. याप्रसंगी संवादादरम्यान शिष्टमंडळातील अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निरसन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

यावेळी शिष्टमंडळात मेजर जनरल (निवृत्त) हरकिरत सिंग, ब्रिगेडियर संजीव सहारण, अरविंद खेमटा, जे एस गिल, बीर विक्रम, नेपाळच्या लष्करातील कर्नल पदावरील अधिकारी मनोज थापा, रशियाचे अलेक्सी ग्रीशेव, इंडोनेशिया येथील फौजी नर्दिन, नायजेरियाचे स्टॅन्ली लुकपाटा ओकपुटू , टांझानिया येथील सादिकी एलियस मिहायो, ओमानचे हिलाल अब्दुल्ला हमीद अल महधोरी आदी उपस्थित होते.

## जल प्रवासी वाहतुकीसाठी वॉटर मेट्रो प्रकल्प तीन टप्प्यात कार्यान्वित करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** ''मुंबई महानगर प्रदेशात जल प्रवासी वाहतुकीसाठी वॉटर मेट्रो प्रकल्प तीन टप्प्यात कार्यान्वित करण्यात येणार असून यादृष्टीने शिपयार्ड विकसित करण्यासाठी जागा निश्चिती केली जावी. जलप्रवासी वाहतूकीसाठी आवश्यक बोटींची बांधणी यातून होऊ शकेल'', असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विधानभवन येथे जलवाहतूक संदर्भात आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली. बैठकीस मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, अपर मुख्य सचिव संजय सेठी यांच्यासह महाराष्ट्र सागरी मंडळाचे सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी देशातील सर्वात मोठी शिपयार्ड सुविधा विकसित करताना त्यावर आधारित सुनियोजित विकास करण्यासाठी कार्यवाही करताना गुणवत्तेची कोणतीही तडजोड न करण्याच्या सूचना दिल्या. ''जल प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक बोटीची बांधणी आपल्याच शिपयार्डमध्ये व्हावी. दुसऱ्या फ`जमध्ये यावर कार्यवाही होण्यासाठी पावले टाकण्यात यावी,'' असे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिपयार्डसाठी जागा उपलब्ध होण्याकडे प्राधान्य देऊन या जलवाहतूक व शिपयार्ड प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश दिले. बैठकीत जलमार्ग, विविध बंदरे विकास, सागरी प्रवासी वाहतूक प्रकल्प यांची सविस्तर माहिती सादर करण्यात आली आहे. यावेळी नांदगाव, दिघी , विजयदुर्ग येथे शिपयार्ड विकसित करणे, मुंबई महानगर क्षेत्रात जलमार्ग कार्यान्वित करणे, ग्रीन फील्ड शिप बिल्डिंग क्लस्टर विकसित करणे बाबत सादरीकरण करण्यात आले.

मुंबई वॉटर मेट्रो

११ नवीन जलमार्ग- २४ नवीन टर्मिनल्स- २१५ किमी

जल मार्ग/टर्मिनल्सचे आधुनिकीकरण- २१ मार्ग, २० टर्मिनल्स- १२५ किमी

एमएमआर प्रदेशातील एकूण जल मार्गाची लांबी- ३४० किमी

सन २०३१ पर्यंत वार्षिक ७.५ कोटी जल प्रवासी संख्या .

नागरी, नौकानयन आणि आपत्कालीन पायाभूत सुविधा- ३,४३६ कोटी रुपये सागरी पायाभूत सुविधा

इलेक्ट्रिक/हायब्रीड जहाजे (बोटी) संख्या- २०७ - खाजगी ऑपरेटर- ३,१५६ कोटी रुपये

जलप्रवासी वाहतुकीसाठी वॉटर मेट्रो प्रकल्प. सुलभ, शाश्वत आणि परवडणारी जलप्रवासी वाहतुकीसाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी () मॉडेलची अंमलबजावणी

मुंबई महानगर प्रदेश मध्ये तीन टप्प्यात कार्यान्वित होणारा हा वॉटर मेट्रो प्रकल्प जगातील जलप्रवासी वाहतुकीतील एक मोठा प्रकल्प ठरेल.

पहिल्या टप्प्यात पंधराशे कोटी रुपये निधी खर्च होईल.

केंद्र सरकारच्या बिल्डिंग क्लस्टर धोरणास अनुसरून शिपयार्ड विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळांने सामंजस्य करार केला आहे. याचबरोबर जहाज बांधणी क्षेत्रातील सार्वजनिक व खाजगी नामांकित उद्योगांना सहभागी करून घेतले जाणार आहे.

## सहज व महसूल मित्रचा राज्यभर डंका; महाराष्ट्रभर राबविण्याची आयोगाची शिफारस

### जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची राज्य सेवा हक्क आयोगाकडून दखल




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी विकसित केलेल्या सहज प्रणाली आणि महसूल मित्र या उपक्रमांची राज्य सेवा हक्क आयोगाने विशेष दखल घेतली आहे. या उपक्रमांचे कौतुक करत, हा बुलढाणा पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस आयोगाने राज्य सरकारकडे केली आहे.

मुंबई येथे पार पडलेल्या राज्य सेवा हक्क आयोगाच्या ३१ व्या बैठकीत डॉ. किरण पाटील यांनी या प्रणालींचे सादरीकरण केले. यावेळी मुख्य सेवा हक्क आयुक्तांनी या उपक्रमांची प्रशंसा करत, यामुळे आणि सेवा हक्क कायद्याची उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य होत असल्याचे नमूद केले.

महसूल मित्र: हा एआय आधारित व्हॉट्सॲप द्विभाषिक (मराठी व इंग्रजी) चॅटबॉट आहे. यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत येणाऱ्या विविध सेवा, आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया यांची माहिती एका क्लिकवर मिळते. विशेष म्हणजे, यात सुविधेसह जमीन विषयक कायदे आणि वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळतात.

सहज प्रणाली: १८५० पासूनचे दुय्यम निबंधक कार्यालयातील खरेदी-विक्रीचे दस्तऐवज या प्रणालीद्वारे संगणकीकृत करण्यात आले आहेत. नागरिक ऑनलाइन द्वारे शुल्क भरून क्यूआर कोड असलेले प्रमाणित दस्तऐवज घरबसल्या डाऊनलोड करू शकतात. यामुळे कार्यालयांचे हेलपाटे वाचणार आहेत.

तक्रार निवारणासाठी जीपीएसचा वापर : या प्रणालीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अवैध वाळू उपसा किंवा इतर महसूल विषयक तक्रारी नोंदवण्यासाठी यात जीपीएस आधारित यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. तसेच विधी सहाय्य, मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, आपलं सरकार सेवा केंद्र आणि आधार केंद्रांची माहितीही या चॅटबॉटवर उपलब्ध आहे.



जिल्हाधिकाऱ्यांच्या या तंत्रस्नेही उपक्रमामुळे सामान्य नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार असून, लवकरच ही प्रणाली राज्यभर लागू झाल्यास महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल.

## नसती उठाठेव, खोडसाळ अहवालाने काय होणार..

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय 'धार्मिकस्वातंत्र्य आयोगा'ने (सीआयआरएफ) रा. स्व. संघ आणि भारताची गुप्तचर संस्था 'आर अ‍ॅण्ड एडब्ल्यू (रॉ)' यांच्यावर मर्यादित निर्बंध घालण्याची शिफारस नुकतीच केली. या आयोगाच्या शिफारशी अमेरिकी सरकारवर बंधनकारक नसल्या, तरी भारताबद्दलचे परराष्ट्र धोरण निश्चित करताना प्रशासनाकडून यासारख्या संस्थांच्या सूचना विचारात घेतल्या जातात. या संस्थेने भारतात धार्मिकस्वातंत्र्य नसल्याचे आणि येथील मुस्लिमांवर अन्याय होत असल्याचे अनेक भंपक अहवाल खरं तर यापूर्वीही दिले आहेत. भारताप्रमाणेच जगातील बहुतेक सर्वच देशांवर ही संस्था अशाप्रकारचे अहवाल प्रसिद्ध करीत असते. त्या अहवालांना जगातील सर्व देश केराची टोपली दाखवितात, हा भाग वेगळा. पण, अमेरिकेचे जागतिक धोरण निश्चित करण्यात अशा संस्थांच्या अर्ध्या-कच्च्या अहवालांचा वाटा असतो, हेही खरेच. म्हणूनच, अशा संस्थांच्या अहवालांना सडेतोड उत्तर देणे गरजेचे बनते. आता तर अमेरिकेवर एका लहरी हुकूमशहाचे अनिर्बंध राज्य सुरू असल्याने अनेक देशांवर कधी कोणती आफत येऊन आदळेल, याचा भरवसा उरलेला नाही. असो. या संस्थेच्या यंदाच्या अहवालात भारतातील रा. स्व. संघ आणि 'रॉ' या दोन संस्थांवर टीका करण्यात आली आहे, हे त्याचे वेगळेपण. या दोन संस्थांच्या कार्यपद्धतीवर टीका करून त्यांच्यावर अमेरिकेने मर्यादित बंधने घालावीत, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. 'भारतात होणाऱ्या अमेरिकी नागरिकांच्या छळवणुकी'मुळे अमेरिकेने भारताला शस्त्रास्त्रे विकू नयेत, असेही या संस्थेने सुचविले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे तर अमेरिकी शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी भारतावर दबाव टाकीत असतात. या स्थितीत ते संस्थेचा हा अहवाल किती गांभीर्याने घेतील, याबाबतही शंका आहे. या अहवालात रा. स्व. संघासारख्या जगातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी संस्थेवर निर्बंध घालण्याची केलेली सूचना केवळ संभ्रम निर्माण करणारीच नव्हे, तर तितकीच खोडसाळही आहे. सर्वच पाश्चिमात्य माध्यमे संघाचे वर्णन 'एक हिंदू लढाऊ (मिलिटन्ट) संस्था' असा करतात. पण, रा. स्व. संघ ही हिंदूंचे धार्मिक अधिकार आणि सांस्कृतिक परंपरा यांच्या हक्कांसाठी प्रयत्न करणारी सेवाभावी संस्था आहे. देशातील कोणत्याही दंगलीत संघ-स्वयंसेवकांचा सहभाग नसतो. मग या संघटनेला 'मिलिटन्ट' का म्हटले जाते? त्यामागे संघाची प्रतिमा मलिन करणे इतकाच उद्देश आहे, हे स्पष्ट होते. आजवर संघावर तीनदा बंदी घालण्यात आली होती. पण, संघ दरवेळी अधिक शक्तिशाली होऊन बाहेर पडला. त्यामुळे संघाचे खरे कार्य आणि त्याची शक्ती जाणून घेतल्याशिवाय'सीआयआरएफ'सारख्या फुटकळ संस्थेने संघाच्या वाटेला जाऊ नये, हेच इष्ट. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्या पत्नी उषा या भारतीय वंशाच्या महिला आहेत. त्यांनी आजही आपला हिंदू धर्म कायम ठेवला आहे. पण, अलीकडेच व्हान्स यांनी एका जाहीर कार्यक्रमात म्हटले होते की, 'आपल्या पत्नीने ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यास मला अधिक समाधान लाभेल.' ज्या देशाचा उपाध्यक्ष जाहीरपणे आपल्या पत्नीला धर्मांतर करण्यास सुचवतो, त्या देशाला भारतासारख्या देशाला धार्मिकस्वातंत्र्याबद्दल उपदेश करण्याचा काहीही अधिकार नाही. गेल्या काही वर्षांत अमेरिकेतील हिंदू नागरिकांना अनेक धार्मिक भेदभाव आणि हल्ल्यांना सामोरे जावे लागत आहे. लॉस एंजेलिससारख्या मोठ्या शहरांतील हिंदू मंदिरांची नासधूस आणि त्यांच्या भिंतींवर अभद्र लिखाण होत असल्याच्या घटना वाढत चालल्या आहेत. '९/११' हल्ल्यानंतर अनेक हिंदू भारतीयांना आणि शीख व्यक्तींना अमेरिकी नागरिकांकडून भेदभावाच्या वागणुकीला सामोरे जावे लागले. सध्याच्या इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेत काही ज्यू मंदिरांवर (सिनेगॉग) आणि ज्यू नागरिकांवर हल्ले झाले आहेत. म्हणजे अमेरिकेतच बिगरख्रिस्ती नागरिक सुरक्षित नसताना ही संस्था अन्य देशींतील धार्मिकस्वातंत्र्याची नसती उठाठेव कशाला करीत आहे? या अहवालाचा अर्थ इतकाच की, भारताचे जागतिक स्तरावर वाढत असलेले महत्त्व आणि आर्थिक व लष्करी ताकद अमेरिकेला खटकत आहे. काहीतरी कारण काढून भारतावर आर्थिक बंधने घालण्याची सबब म्हणून 'सीआयआरएफ'सारख्या संस्थांच्या अहवालाची ढाल पुढे केली जाते. या संस्थेने कशाच्या आधारावर आपले निष्कर्ष काढले आहेत, त्यासाठी कोणते ठोस पुरावे दिले आहेत, याबाबत काहीही स्पष्टीकरण केले जात नाही. तसेच त्यासंदर्भात भारतातील संबंधित संस्थांना किंवा सरकारला आपली बाजू मांडण्याचीही संधी दिली जात नाही. त्यामुळे यासारख्या संस्थांच्या अहवालाची विश्वासार्हता शून्यच. भारतातील गावांमध्ये संध्याकाळी चावडीवर बसलेले काही लोक ऐकीव माहितीवर इतरांच्या जशा कुचाळया करतात, तितकीच या अहवालाची किंमत! त्यामुळे या अहवालाकडे गांभीर्याने पाहण्याची मुळीच गरज नाही. पण, या अहवालाला लगोलग प्रमाण वगैरे मानून काँग्रेसनेही 'सीआयआरई'च्या मागणीत आपला सूर मिसळला. कारण, जिथे जिथे काही संघविरोधी, देशविरोधी दिसले की, काँग्रेस आयते कोलीत मिळाल्यासारखे त्या मुद्द्यावर तुटून पडते. एरवी अमेरिका आणि ट्रम्प यांना उठसूठ बोल लावणाऱ्या या नेतृत्वहीन, गोंधळलेल्या पक्षानेही आताही तेच केले, त्याचे नवल ते काय! गतवर्षी भारताने स्वत:चा 'रिस्पॉन्सिबल नेशन्स इंडेस' (आरएनआय) सुरू केला आहे. अनेक देशांच्या केवळ 'जीडीपी' आणि लष्करी विकासापेक्षा या सूचित प्रत्येक देशाचे प्रशासन आपल्या नागरिकांसाठी किती नैतिक आचरण करते आणि जागतिक नेतृत्वास पोषक संवाद साधते, यावर भर दिला गेला आहे. त्यात प्रामुख्याने तीन निकषांवर प्रत्येक देशाचे स्थान निश्चित केले जाते. ते म्हणजे, आंतरिक जबाबदारी (नागरिकांचे कल्याण), पर्यावरणीय जबाबदारी (पर्यावरणरक्षणावरील उपाय) आणि बाह्य जबाबदारी (जागतिक शांतता). या निकषांवर पहिल्या सूचित पहिल्या पाच स्थानांवर अनुक्रमे सिंगापूर, स्वित्झर्लंड, डेन्मार्क, सायप्रस व स्वीडन हे देश होते. त्यात भारताचे स्थान १६वे होते आणि ते अमेरिका व चीनपेक्षा अग्रस्थानी होते. भूतानचे सरकार 'जीडीपी'ऐवजी आपल्या नागरिकांच्या समाधानाचा स्तर किती आहे, ते मोजते. भारताने आता सर्व पाश्चिमात्य देशांसाठी स्वत:ची धार्मिकस्वातंत्र्य सूची (इंडेस) सुरू करावी. तसे केल्यास या भंपक संस्थांच्या खोडसाळ अहवालांना जसास तसे प्रत्युत्तर दिले जाऊ शकेल!

# साखळी खु. येथे जल अर्पण दिवस उत्साहात साजरा

## पाऊस पाणी संकलनावर भर द्यावा - गटविकास अधिकारी डॉ. अमिता पवार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ग्रामीण भारतात जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा पायाभूत सुविधा आता उभारल्या गेल्यामुळे गावे पाणीपुरवठा प्रणालीच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात प्रवेश करत आहेत. या केवळ पायाभूत सुविधा नसून समुदाय आणि सरकार यांच्यातील अनेक वर्षाचा आशावाद, प्रयत्न आणि भागीदारीचे प्रतीक आहे.

या योजना पूर्ण झाल्यानंतर त्यांचे हस्तांतरण काळजीपूर्वक, स्पष्टतेने आणि सामायिक अभिमानाने केले पाहिजे. ज्यामुळे पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती आणि समुदायाच्या हाती येईल.जे आता त्यांच्या गावाच्या पाणीपुरवठा प्रणालीचे संरक्षक म्हणून नेतृत्व करतील. यासाठी दिनांक ८ मार्च ते २२ मार्च दरम्यान देशभर जल जीवन मिशन योजनेअंतर्गत जल उत्सव साजरा करण्यात येत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून आज बुलढाणा तालुक्यातील साखळी खुर्द येथे जल अर्पण दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमा





दरम्यान पाऊस पाणी संकलनावर भर देण्याचे आवाहन पंचायत समिती बुलढाणाच्या गटविकास अधिकारी डॉ. अमिता पवार यांनी केले.

देशभर राबविण्यात येत असलेल्या जल उत्सवा मध्ये दिनांक ८ ते २२ मार्च दरम्यान जी गावे हर घर जल घोषित झालेली आहेत, आणि योजना हस्तांतरित झालेल्या आहेत अशा गावांमध्ये जल अर्पण दिवस साजरा करण्यात येत आहे. यासाठी तांत्रिक पूर्वतयारी करायची आहे त्यामध्ये १५ ते ३० दिवसाचे नळ पाणी पुरवठा योजनेची चाचणी घ्यायची आहे. योजनेचे उपंगाची पाहणी व पडताळणी करायची आहे. दस्तऐवजाची उपलब्धता असणे गरजेचे आहे. पाणी गुणवत्तेचे फिल्ड टेस्ट किटद्वारे तपासणी करायची आहे. तसेच संस्थात्मक पूर्वतयारी यामध्ये महत्त्वाची आहे. बँक खात्यासह कार्यान्वित पाणीपुरवठा स्वच्छता समिती असणे गरजेचे आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ जसे ऑपरेटर, नल जल मित्र यांची आवश्यकता आहे. स्त्रोत शाश्वतता आणि सुरक्षितता आराखडा यामध्ये गरजेचा आहे. ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा स्वच्छता समिती ऑपरेटर यांचे प्रशिक्षण तत्पूर्वी होणे अनिवार्य आहे.

शासनाच्या निर्देशाप्रमाणे हस्तांतरण चे दस्तऐवजीकरण अनिवार्य आहे. तसेच लोकसभागीय जाणीव जागृती ही यासाठी गरजेची आहे. ग्रामसभा घेणे पीआरएचे आयोजन करणे फिल्ड टेस्ट किटचे प्रात्यक्षिक करणे, बचत गट सदस्य, अशा, अंगणवाडी सेविका, शिक्षक, युवक इत्यादींचा सुरक्षित पाणी व्यवस्थापनामध्ये सहभाग घेणे, विविध स्पर्धांचे आयोजन करणे, असे विविध उपक्रम यादरम्यान राबवणीच्या सूचना आहेत. त्यानुसार बुलढाणा तालुक्यातील साखळी खुर्द या गावांमध्ये १७ मार्च रोजी जल अर्पण दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान जल पूजन, नळपूजन, जल प्रतिज्ञा विद्यार्थ्यांचे पाण्याबाबतचे भारुड, गाणे, नृत्य सादरीकरण, शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, उपस्थित यांना पाण्याबाबत मार्गदर्शन आदी उपक्रम राबवून जल अर्पण दिवस साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायत साखळी खुर्द चे सरपंच पंडित बळीराम हिवाळे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच गटविकास अधिकारी डॉ. अमिता पवार या प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या होत्या. अध्यक्षीय भाषणामध्ये सरपंच पंडित हिवाळे यांनी पाण्याबाबत आजच सर्वांना जागरूक राहून पाण्याचा सूक्ष्म नियोजन करून व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले. तसेच उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग बुलढाणा नितेश घुसळकर यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे जलारपण दिवस उपक्रमाबाबत उपस्थितांना माहिती दिली. जल प्रतिज्ञा जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे संदीप सुखधान यांनी घेतली तसेच मनीषा शेजव यांनी उपस्थिताना पाणीपुरवठा स्वच्छता समिती बाबत तसेच पाऊस पाणी संकल्पना बाबत मार्गदर्शन केले.

शाखा अभियंता शुभम बारोटे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला साखळी खु. चे उपसरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट सदस्य, गावकरी, शालेय शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेऊन पाण्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली आणि भविष्यात पाण्याचा अपव्यय करणार नाही हा संकल्प केला.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन उप अभियंता नितेश घुसळकर यांच्या चमुने, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे संदीप सुखधान, मनीषा शेजव, किरण शेजोळे यांनी तसेच गट संसाधन केंद्राच्या जया गवई, वर्षा खैरे यांनी केले.

## ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे, या दृष्टीने केंद्र शासनाने 'ज्ञानभारतम्' या प्रकल्पाची आखणी केली आहे.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने ही हस्तलिखिते राज्य शासनाकडे सुपूर्द करावयाची झाल्यास शासन ती स्वीकारेल. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत:

कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ,नागपूर क्लस्टर केंद्र

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था,पुणे क्लस्टर केंद्र

आनंद आश्रम संस्थान,पुणे स्वतंत्र केंद्र

भारत इतिहास संशोधक मंडळ,पुणे स्वतंत्र केंद्र

महाराष्ट्रासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत "Gyan Bharatam" हे मोबाईल अ‍ॅप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, आपल्याकडे जर काही हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल अ‍ॅप वर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा.

## मृणाल ठाकूरनं घेतलं पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दर्शन...

हैदराबाद : अभिनेत्री मृणाल ठाकूरनं पुण्यात गेल्यानंतर बाप्पाचे दर्शन घेतलं आहे. अभिनेत्रीनं मंगळवारी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात प्रार्थना केली, ज्याची झलक तिच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर देखील तिनं शेअर केली आहे. कमीत कमी मेकअपसह लाल एथनिक पोशाखात मृणाल हात जोडून कॅमेऱ्याकडे पोझ देताना दिसत आहे. आता तिनं शेअर केले फोटो तिच्या चाहत्यांना खूप पसंत येत आहेत. या फोटोंच्या कमेंट विभागात अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देऊन तिचे कौतुक करताना दिसत आहेत. तिनं शेअर केलेल्या पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, मी पुण्यात आलो आणि बाप्पाचे दर्शन घेतले नाही, तर मी काय केले? मृणाल ही त्या सेलिब्रिटींपैकी एक आहे, जिला तिच्या आयुष्यातील प्रत्येक पैलू नेटिझन्सबरोबर शेअर करायला आवडते.

# सुरक्षित शहरांसाठी सीसीटीव्हीचे प्रभावी सुरक्षा कवच निर्माण करण्यात यावे- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## - सीसीटीव्ही यंत्रणेच्या सनियंत्रणासाठी महामंडळाची निर्मिती करा
## - माहिती व तंत्रज्ञान विभागाची आढावा बैठक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** नागरिकांसाठी भयमुक्त वातावरण राहता यावे यासाठी राज्यात सुरक्षित व गुन्हेमुक्त शहरे करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. यासाठी राज्य शासन आवश्यक उपाययोजनांची अंमलबजावणी करीत असून सीसीटीव्ही यंत्रणेचे जाळे मजबूत करण्याचादेखील समावेश आहे. येत्या काळात सुरक्षित शहरांसाठी सीसीटीव्हीचे जाळे मजबूत करून प्रभावी सुरक्षा कवच निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

माहिती व तंत्रज्ञान विभागाने गृह, नगरविकास विभागाच्या समन्वयातून सीसीटीव्ही यंत्रणेच्या प्रभावी उपयोगासाठी, शहरांमधील खासगी सीसीटीव्ही डेटाचा गुन्हे तपासासाठी उपयोग करणे आणि शूटिंग बुद्धिमत्तेवर आधारित सीसीटीव्ही यंत्रणा निर्माण करण्यासाठी महामंडळाची निर्मिती



करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. विधान भवन येथे माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माहिती व तंत्रज्ञान विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, सीसीटीव्ही यंत्रणेवर आधारित महानेत्रा धोरण आणि महाराष्ट्र अनमॅन्ड सिस्टीम धोरण अंतिम करावे. सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योगांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अनुषंगाने सामान्यपणे लागणाऱ्या सेवांसाठी यंत्रणा निर्मिती करावी. भविष्य हे मानवी हस्तक्षेपणाशिवाय कृतिशील असणारे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने नवनवीन संशोधन यामध्ये होत आहेत. शासनातही मानवी हस्तक्षेपाशिवाय करता येणे शक्य असलेल्या कामांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. त्यासाठी म्युजिक (महाराष्ट्र अनमँड सिस्टीम अँड इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन) या नव्या महामंडळाची निर्मिती करावी. या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान तसेच मानवी हस्तक्षेपाशिवाय करण्यायोग्य कामांमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे शक्य होईल.

सध्या कृषी विभागात ड्रोन तंत्रज्ञान उपयोगात येत आहे. या तंत्रज्ञानाचा मानवी आयुष्यासाठी सकारात्मक उपयोग आहे .या क्षेत्रात ड्रोन संशोधन महत्त्वाचे असून ड्रोनची निर्मिती, त्यामधील सॉफ्टवेअर तसेच ड्रोनचा विघातक कार्यासाठी होणारा उपयोगही थांबवायला हवा. अशा सर्व बाबींचा समावेश नवीन धोरणामध्ये असावा. शहरांमध्ये निर्माण करण्यात येत असलेले सीसीटीव्ही यंत्रणेवर इंटिग्रेटेड कंट्रोल अँड कमांड सेंटर असावे. कमांड अँड कंट्रोल सेंटरमध्ये या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग असावा. तसेच खासगी क्षेत्राच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाने युक्त ही केंद्र असावीत. या संपूर्ण परिसंस्थेच्या निर्मितीमधून या क्षेत्रात जागतिक स्पर्धेमध्ये महाराष्ट्र कुठेही कमी असणार नाही, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

राज्याकडे विविध योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी खूप मोठ्या प्रमाणावर डेटा आहे. हा डेटा महासारथी पोर्टलवर उपलब्ध आहे.

या डेटाचा योजनांना अधिकाधिक लाभ देण्यासाठी कशा पद्धतीने उपयोग झाला पाहिजे, याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या महासारथी धोरणाची निर्मिती करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (कृषी) विकास रस्तोगी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती आदी उपस्थित होते. माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग यांनी सादरीकरण केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### बुलडाणा डाक विभागाची उल्लेखनीय कामगिरी; पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक खात्यांचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलडाणा डाक विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक () खात्यांच्या निव्वळ वाढीचे निर्धारित उद्दिष्ट १०० टक्के यशस्वीरित्या पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विभागाला १ लाख ४० हजार नवीन खात्यांच्या निव्वळ वाढीचे उद्दिष्ट देण्यात आले होते, ते पूर्ण करण्यात बुलडाणा विभागाने आघाडी घेतली आहे. महाराष्ट्र व गोवा परिमंडळामध्ये अशी कामगिरी करणारा बुलडाणा विभाग प्रथम क्रमांकावर असून ही बाब विभागासाठी अभिमानास्पद मानली जात आहे. या यशामागे विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एकत्रित प्रयत्न महत्त्वाचे ठरले. उपविभागीय अधिकारी, पोस्टमास्तर, सहाय्यक कर्मचारी, ग्रामीण डाक सेवक, पोस्टमन आदींनी नागरिकांमध्ये बचत योजनांविषयी व्यापक जनजागृती केली. आवर्ती ठेव (), सुकन्या समृद्धी खाते () यांसारख्या विविध योजनांचा प्रभावी प्रचार-प्रसार करण्यात आला. ग्राहकाभिमुख सेवा, विश्वासार्हता आणि सुलभता यांवर भर देत ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर नवीन खाती उघडण्यात आली. यामुळे नागरिकांमध्ये बचतीची सवय वाढीस लागून आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बुलडाणा डाक विभागाचे कौतुक केले आहे. अधीक्षक डाकघर बुलडाणा विभाग गणेश आंभोरे यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी कायम ठेवण्याचे आवाहन केले. तसेच, ग्राहकांना दर्जेदार व उत्कृष्ट सेवा पुरविण्यासाठी विभाग कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

### उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी आता 'एक खिडकी' योजना राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी आता महसूल विभाग, महानगरपालिका आणि भूमि अभिलेख विभागाची संयुक्त 'एक खिडकी योजना' सुरू करण्यात येईल, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत सांगितले. या प्रक्रियेत दिरंगाई करणाऱ्या किंवा निष्क्रियता दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेतही त्यांनी यावेळी दिले. आमदार डॉ.बालाजी किणीकर यांनी ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहरासंदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती. राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, यांनी २००५ पासूनच्या धोरणांचा आणि सद्यस्थितीचा आढावा मांडला. राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासंदर्भात शासनाच्या २००६ च्या अधिनियमातंर्गत जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिले होते. बांधकामे नियमित करण्याबाबत त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडे २२,०१३ अर्जांपैकी १५,५८७ अर्ज तांत्रिक कारणांमुळे फेटाळले गेले होते आणि केवळ १३८ जणांना 'डी' फॉर्म (नियमितीकरणाचे प्रमाणपत्र) मिळू शकले होते. त्यानंतर २०१९ मध्ये हे अधिकार आयुक्तांकडे अधिकार सोपवण्यात आले. मात्र, कोरोना काळ आणि रेडिरेकनरच्या जाचक दरांमुळे या योजनेला हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, नागरिकांचा अल्प प्रतिसाद पाहून १४ मार्च २०२४ रोजी सरकारने नियमांत सुधारणा केली. आता रेडिरेकनरच्या केवळ १० टक्के शुल्क भरून बांधकामे नियमित करण्याची तरतूद केली. सुधारित धोरणानुसार सुमारे १ लाख ८० हजार मालमत्ताधारकांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. आतापर्यंत प्राप्त ४४५ प्रस्तावांपैकी १३ जणांना 'डी' फॉर्म देण्यात आले आहेत, तर ३५९ प्रस्तावांमध्ये कागदपत्रांच्या त्रुटी असल्याने त्यांना पूर्ततेसाठी वेळ देण्यात आला आहे नियमितीकरणाच्या प्रक्रियेत त्रुटी असल्यास त्या तपासल्या जातील आणि आवश्यक सुधारणा केल्या जातील.

# ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत विजेत्या भारतीय संघाचे केंद्रिय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत भारताला सुवर्ण पदक मिळवुन देणाऱ्या भारतीय संघाचे केंद्रिय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वागत केले असुन भारतीय संघात सहभागी झालेल्या सागर बोर्डे यांचा प्रातिनीधीक स्वरुपात सत्कार केला. साऊदी अरब येथील रियाद येथे १ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान ऐशियन लेक्रॉस स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये भारतीय संघामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथील सागर बोर्डे सहभागी झाला होता. त्यांच्या संघाने इराक विरुध्द झालेल्या शेवटच्या सामन्यामध्ये ९-२ फरकाने विजय मिळवत भारताला ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत अजिंक्य पद मिळाले. या संघामध्ये देशभरातुन १८ खेळाडु सहभागी झाले होते. विजेत्या चमुचे केंद्रिय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वागत केले असुन प्रातीनिधीक स्वरुपात मेहकर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात संघातील खेळाडु सागर बोर्डे यांची नुकत्याच सत्कार केला.



### त्यानं मॅगझिन भरलं, छातीवर बंदूक ठेवली अन्; व्हिडिओ बनवताना तरुणाने स्वत:वरच झाडली गोळी, काळजाचा थरकाप उडवणारी घटना!

नवी दिल्ली : पूर्व दिल्लीतील न्यू अशोक नगर परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका व्यक्तीने चुकून स्वत:च्या छातीत गोळी झाडल्याने त्याचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, ही संपूर्ण घटना त्याचा मित्र मोबाईलवर चित्रीत करत होता. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओ करताना चुकून गोळी लागण्याने तरुणाचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, व्हिडिओच्या सुरुवातीला चित्रीकरण करणारी व्यक्ती त्या व्यक्तीला पिस्तुलात मॅगझिन कसे घालायचे याबाबत सूचना देताना ऐकू येते. ''बटण दाबा, ते आत जाईल,'' असे तो सांगत होता. मॅगझिन भरल्यानंतर संबंधित व्यक्ती पिस्तूल कॉक करताना दिसतो. त्यावेळी कॅमेऱ्यामागील व्यक्ती ''गोळी चालवू नको भाई,'' असेही म्हणताना ऐकू येते.काही क्षणांनी त्या व्यक्तीने पिस्तूल छातीच्या डाव्या बाजूला ठेवले. कॅमेऱ्याकडे पाहून तो क्षणभर हसला आणि अचानक ट्रिगर दाबला. गोळी लागल्यानंतर तो तात्काळ कोसळला आणि जखमेतून रक्तस्राव सुरू झाला. ही घटना पाहून चित्रीकरण करणारी व्यक्ती घाबरून ''भाई, क्या कर दिया तूने?'' (मित्रा, तू काय केलंस?) असे ओरडताना ऐकू येते.पोलिसांनी मृत व्यक्तीची ओळख पवन अशी पटवली आहे. घटनेनंतर त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत वापरलेले पिस्तूल हे व्हिडिओ चित्रीत करणाऱ्या व्यक्तीचे परवानाधारक शस्त्र होते.

## खामगाव पोलिसांचा धडक छापा, १.03 लाखांचा मुद्देमाल जप्त

### बेकायदेशीर LPG गॅस रिफिलिंगवर मोठी कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**खामगाव/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुरू असलेल्या बेकायदेशीर LPG गॅस साठवण व रिफिलिंग व्यवसायावर खामगाव पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी ५ आरोपींवर आवश्यक वस्तू कायद्यानुसार (EC Act) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत नागरिकांना मिळणाऱ्या LPG गॅसचा काळाबाजार, बेकायदेशीर वाहतूक व रिफिलिंग यावर नियंत्रण आणण्यासाठी पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार अपर पोलीस अधीक्षक श्रीपक लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने ही छापेमारी केली. दि. १७ मार्च २०२६ रोजी खामगाव शहरातील मुक्ताकळी नगर, पारपेठ, लालपुलाजवळ, भालेगाव रोड, शिवाजीनगर, संत रविदासनगर व काशीरामपुरा या भागांमध्ये पोलिसांनी धडक कारवाई केली. या ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरमधून वाहनांमध्ये बेकायदेशीररीत्या गॅस रिफिलिंग केले जात असल्याचे आढळून आले.

या कारवाईत जाकीरखान सिकंदरखान (३७, मुक्ताकळी नगर), नितीन गुणाजी परसे (४२, संत रविदासनगर), लक्ष्मण मोहन हंबर्डे (३२, शिवाजीनगर), शेरसिंह धनसिंग राजपूत (४०) व शाकीरखान सिकंदरखान (४५, काशीरामपुरा) या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी छाप्यात प्रेशर पंप, विद्युत मोटर, रबरी नळ्या, नोजल, इलेक्ट्रिक बोर्ड आणि गॅस सिलेंडर असे साहित्य जप्त केले असून त्याची एकूण किंमत १,०३,००० इतकी आहे. या साहित्याचा वापर करून सिलेंडरमधील गॅस वाहनांमध्ये भरला जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, खामगाव यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या विशेष पथकाने पार पाडली. दरम्यान, जिल्ह्यातील गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर साठवण व रिफिलिंग करणाऱ्यांवर प्रशासनाची कडक नजर असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# गॅस टंचाईमुळे हिवरा आश्रमातील गुरुकुलमध्ये चुलीवर स्वयंपाक; तीन हजार विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम देशात गॅस पुरवठ्यावर होत असून अनेक ठिकाणी व्यावसायिक गॅसचा तुटवडा जाणवत आहे. याच पार्श्वभूमीवर मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम येथील गुरुकुलमध्ये सध्या चुलीवर स्वयंपाक करून विद्यार्थ्यांचे जेवण तयार केले जात आहे.





हिवरा आश्रम येथे सुमारे सहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकी जवळपास तीन हजार विद्यार्थी गुरुकुलमध्ये निवासी स्वरूपात राहतात. या विद्यार्थ्यांच्या रोजच्या दोन वेळच्या जेवणासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंपाक करावा लागतो. मात्र, व्यावसायिक गॅसचा पुरवठा खंडित झाल्यामुळे स्वयंपाकासाठी चुलीचा आधार घ्यावा लागत आहे.

सध्या वाढत्या उष्णतेत आणि चुलीच्या धुरामध्ये काम करावे लागत असल्याने स्वयंपाक करणाऱ्या महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मोठ्या प्रमाणात लाकूड जाळून स्वयंपाक करावा लागत असल्याने वेळ आणि श्रम दोन्ही वाढले आहेत.

याबाबत आश्रमाचे सचिव संतोष गोरे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तात्पुरता उपाय म्हणून चुलीवर स्वयंपाक केला जात आहे. मात्र विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने तात्काळ व्यावसायिक गॅसचा पुरवठा सुरळीत करणे आवश्यक आहे.

दरम्यान, स्वयंपाकी महिलांनीही लवकरात लवकर गॅसचा पुरवठा सुरू करून दिल्यास काम सोपे होईल आणि विद्यार्थ्यांचे जेवण वेळेत तयार करता येईल, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## शब्दकोडे क्र. 83

आडवे शब्द

१. पुलंचा लेखक म्हणून अखेरचा चित्रपट- 'एक होता -----' ३. वार्ताहर ७. दाद, पोहोच ९. स्पष्ट उच्चार करता न येणारा १०. गतीमान १२. आरोळी १४. यावर्षी १५. गडीमाणसे १८. 'नॅनो' आणणारे टाटा २१. कंटाळवणे (भाषण) २३. करायला गेला मारुती आणि झाले ---! २५. राष्ट्राची सीमा २९. मोका, संधी ३१. विश्वासघातकी ३२. खाटीक ३३. पदर ३४. दबा धरणे ३६. किरकोळ सामान ३९. आश्चर्याची गोष्ट ४२. आमटे, आढाव या समाजसेवकांचे प्रचलित नाव ४४. मोठी गाडी (सं.) ४६. दारावरील खुणेचा आवाज ४८. सजीव-निर्जीव सर्व ५०. नाकावरचा राग ५२. एक जंगली फूल ५३. भिक्षापात्र ५४. रक्त देणे ५७अ. कूळ कायद्याचे मूळ तत्त्व ६१. तात्काळ ६४. विषमच्या विरुद्ध ६६. केसांची बट ६८. पावलोपावली ६९. श्री विष्णूचे एक नाव ७१. किंचित वाकडा ७३. नवरत्नांपैकी एक प्राणिज रत्न ७४. कारस्थानी ७५. दाट, घट्ट ७६. अभिप्राय

उभे शब्द

१. प्रशाला २. क्रिकेटमधील सहाचा फटका ३. च्या बद्दल ४. अखेर, शेवट ५. वैरी ६. अंगातीक मस्ती, जोम ७. जन्मदाता ८. मनात संशय निर्माण होणे याअर्थी वाक्प्रचार ११. बडबड्या १३. पद्धतीनुसार १६. लक्ष्मी १७. बाजू, काठ १९. पुरुष २०. खोट्या नाण्याचा आवाज २२. टाळाटाळ, चुकवाचुकव २४. वार २६. हद्दीच्या पलीकडे २७. मिठाची चव २८. शिर्डीचे संत २९. अमावस्या ३०. वारा (सं.) ३१. होम ३५. सैन्याचे पथक ३७. घाबरणे ३८. तफावत, अंतर ४०. जंगलात विहार करणारे प्राणी ४१. परमेश्वर ४२. भारतभूषणचा गाजलेला सिनेमा, बैजू --- ४३. केर ४५. प्रेतावरील कापड ४६. रोखलेली नजर ४७. शेंगेवरील आवरण ४९. युद्ध, मारामारीत रक्त सांडणे ५१. घटस्फोट ५३. दगडाचा पातळ पापुद्रा ५५. नाठाळ, आडमुठ्या ५६. खळबळजनक ५७. चुलती ५८. सेनानायक ५९. हिंदीत राजीनामा ६०. वजनदार ६२. पाण्याचा गोंगाट? ६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ ६५. शूर पुरुष ६७. हिंदुस्थान ६९. सततचे नामस्मरण ७०. पर्वत ७२. समान, तुल्यबळ


### शब्दकोडे क्र. 82 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कुलवधू ४.कानवला ७.रगमतगमत १२.माग १३.पहेलवान १५.मगर १६.नोट १७.रब १८.लव १९.राजराणी २१.मोह २२.वग २४.जयजयकार २८.खास २९.रज ३१.कसाबसा ३३.सावज ३६.मारामारी ३८.हर हर ४०.तन मन ४३.पाडवा ४५.सवत ४६.पापा ४७.मकर ४८.कल्प ४९.कळस ५०.सतत ५१.साव ५२.मत ५४.लगत ५६.टपाल ५८.टोळ ५९.सहज ६२.पोक ६३.बरसात ६५.कोरी ६६.अवयव ६७.दामचुंबक ६९.याचक ७०.ठार मारणे ७३.तगर ७५.रूस ७७.मानव ७९.जर ८०.रसद ८४.नरकवास ८५.साम ८६.मनमुराद

उभे उत्तर

१.कुमारवय २.लगबग ३.धूप ४.कालवण ५.नव ६.वनराज ७.रमणीय ८.मग ९.तर १०.मनोहर ११.तट १४.हेल २०.राजस २१.मोका २३.कसाब २५.जर २६. यजमान २६अ.खासा २७.वसाहत २८.खाज ३०.परिवार ३१.कवडसा ३२.साहस ३४.वर ३५.मौन ३७.मादक ३९.रवरव ४०.तपास ४१.मद्रास ४३.पारखणे ४४.वायफट ४६.पाळत ४७.मतलब ४९.कमळ ५१.साल ५३.ना हरकत ५७.पाणवठा ५८.टोकदार ५९.सबब ६०.जसा ६१.ठेव ६४.तयार ६५.कोकरू ६६.असामान्य ६८.मणेर ७१.रजक ७२.मरवा ७४.गरम ७६.सरोद ७८.वन ८१.ससा ८२.दम ८३.चमू



# अमेरिका-इराण युद्धाचा पारले-जी बिस्किटांनाही फटका, उत्पादन ठप्प; ५२५ कामगारांवर टांगती तलवार!









दैनिक आपला विदर्भ

**खामगाव/प्रतिनिधी :** खामगाव येथील 'शिवांगी बेकर्स' कंपनी ही प्रसिद्ध 'पार्ले-जी' बिस्किटांचे उत्पादन करते. बिस्कीट उत्पादन साठी मोठ्या आकाराचे विशिष्ट सिलिंडर लागतात. मात्र हा गॅसच उपलब्ध नसल्याने सुप्रसिद्ध पारले जी चे उत्पादन मागील अनेक दिवसापासून बंद पडले आहे. यामुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान होत असतानाच शेकडो कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पार्ले जी ही या क्षेत्रातील आघाडीची कंपनी आहे.

शिवांगी बेकर्समध्ये प्रामुख्याने 'क्रीम' आणि 'ग्लुकोज' बिस्किटांचे उत्पादन घेतले जाते. प्राप्त माहितीनुसार यामध्ये पिढ्यानंपिढ्या आबालवृद्धांचे आवडते बिस्कीट असलेल्या पारले जी (ग्लुकोज) बिस्कीट सह ऑरेंज, पाईनापल, इलायची आदि सात चवीच्या (फ्लेवरचे) बिस्कीटचे उत्पादन केले जाते.

येथील बिस्किट बनवण्याचे काम मोठ्या आकाराच्या ओव्हन च्या मदतीने केले जाते. ते पूर्णपणे मोठ्या आकाराच्या गॅसवर चालतात.मात्र, अमेरिका, इस्त्राईल आणि इराण मधील युद्धामुळे व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर मर्यादा आल्या आहेत.यापरिणामी, कंपनीला आवश्यक असलेला गॅस पुरवठा खंडित झाला असून, 'ग्लुकोज ओव्हन' सह संपूर्ण उत्पादन प्रक्रिया थांबवावी लागली आहे. या कंपनीत कार्यालयीन कर्मचारी मिळून ५२५ हून अधिक कामगार कार्यरत आहेत. या सर्वांसह त्यांच्या परिवारातील सदस्यांचा उदरनिर्वाह पूर्णपणे पारले कंपनीवर अवलंबून आहे.उत्पादन बंद राहिल्याने या कामगारांच्या कुटुंबासमोर आर्थिक पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. ''कंपनी लवकर सुरू झाली नाही, तर कामगारांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागेल,''अशी भीती कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.

बिस्किटे ही जीवनावश्यक वस्तूंच्या श्रेणीत येतात. शिवांगी बेकर्समधून होणारे उत्पादन थांबल्यामुळे येत्या काळात बाजारपेठेत पार्ले-जी बिस्किटांचा तुटवडा जाणवण्याची दाट शक्यता आहे. उत्पादन पूर्णपणे ठप्प असल्याने कंपनीला दररोज लाखो रुपयांचा फटका सोसावा लागत आहे. कच्च्या मालाची भरपूर उपलब्धता असली तरी गॅस नसल्याने सर्व यंत्रणा गंजण्याची भीती निर्माण झाली आहे.

कंपनीने युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेऊनही पूर्व नियोजन न केल्याने गॅसची अडचण निर्माण झाल्याची ओरड कामगारातून होत आहे. दरम्यान खामगांव शहर हे राज्याचे कामगार मंत्री यांच्या खामगांव विधानसभा मतदारसंघाचा केंद्रबिंदू आहे. विधानसभेतच नव्हे खामगांव पालिका निवडणुकीत सुद्धा खामगांव वासियांनी भाजपला अर्थात फुंडकरांना पाठबळ दिले आहे. युती शासनाने त्यांना कामगार मंत्री हे महत्वाचे खाते दिले आहे. मात्र कामगार मंत्र्यांच्या शहरातील आणि तेही पारले जी सारखी कम्पनी केवळ गॅस तुटवड्यामुळे बंद पडणे त्यांच्यासाठी नामुश्किची बाब आहे.

दुसरीकडे कामगार प्रतिनिधी दीपक सुलताने आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी या प्रकाराबद्धल तीव्र नाराजी व्यक्त केली असून गॅस टंचाई ला कंपनीचा नियोजन शून्य कारभार जवाबदार असल्याचा आरोप केला. खामगांव चे आमदार तथा कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी तातडीने यात हस्तक्षेप करावा अशी अपेक्षा त्यांनी बोलून दाखविली. बंद काळातील पूर्ण पगार देण्याची मागणी त्यांनी व्यवस्थापनाकडे केली आहे. या बंद काळात कामगारांना अर्धा पगार देण्यात येणार आहे.

## वृत्तविशेष...

### धाड-मासरुळ जि.प. सर्कलच्या मतदार यादीत बनावट नावांचा आरोप; भाजप शिष्टमंडळाची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



दैनिक आपला विदर्भ


**बुलढाणा/प्रतिनिधी :** आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धाड-मासरुळ जिल्हा परिषद सर्कलच्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणात बनावट नावे समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात भाजप पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन संबंधित नावे तात्काळ वगळण्याची मागणी केली.

भाजप पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, धाड-मासरुळ सर्कलच्या मतदार यादीत सुमारे १५०० ते २००० नावे संशयास्पद असल्याचा दावा करण्यात आला आहे. या नावांपैकी काही मतदार हे महाराष्ट्राबाहेरील राज्यांतील असल्याचेही शिष्टमंडळाने सांगितले. काही प्रकरणांमध्ये एकाच मतदाराचे नाव आसाम, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्र अशा तीन राज्यांच्या मतदार यादीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भातील कागदपत्रे व पुरावे सादर करत भाजप शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली. तसेच मतदार यादीची सखोल चौकशी करून बनावट नावे तात्काळ वगळावीत आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, या विषयामुळे स्थानिक पातळीवर राजकीय वातावरण तापले असून आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा अधिक चर्चेत आला आहे. या प्रकरणी प्रशासनाने लवकरात लवकर चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडूनही होत आहे.

### गॅस तुटवड्याच्या अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाईचा इशारा; जिल्ह्यात २५ हजारांहून अधिक सिलेंडर उपलब्ध







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देशभरात गॅस तुटवड्याच्या चर्चेमुळे अनेक ठिकाणी नागरिकांकडून गॅस सिलेंडरसाठी गर्दी होत असली तरी बुलढाणा जिल्ह्यात घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. तसेच गॅस संदर्भात समाज माध्यमांवर अफवा पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

अलीकडील काही दिवसांत गॅस तुटवड्याच्या अफवांमुळे जिल्ह्यातील विविध गॅस एजन्सीसमोर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. मात्र जिल्ह्यात सध्या घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा नियमितपणे सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गौरवसिंग राजपूत यांनी सांगितले की, जिल्ह्यात दररोज सरासरी सुमारे १० हजार गॅस सिलेंडरची मागणी असते. सध्या जिल्ह्यात २५ हजारांहून अधिक सिलेंडर उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाऊन अतिरिक्त सिलेंडर खरेदी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, गॅस तुटवड्याबाबत समाज माध्यमांवर चुकीची माहिती किंवा अफवा पसरवून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## मेहकरमध्ये सार्वजनिक इफ्तार पार्टी; बंधुभाव आणि एकतेचा संदेश

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर मेहकर येथे वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया यांच्या वतीने सार्वजनिक इफ्तार पार्टीचे आयोजन उत्साहात करण्यात आले. मेहकर नगर परिषद मैदानात झालेल्या या कार्यक्रमात शहरातील विविध धर्म व समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि एकतेचा सुंदर संदेश दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी रमजान महिन्याचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करत समाजात शांतता, सौहार्द आणि परस्पर आदराची भावना जपण्याचे आवाहन करण्यात आले. इफ्तारच्या वेळी सर्वांनी एकत्रितपणे रोजा सोडत शहराच्या प्रगतीसाठी तसेच देशात शांतता व सलोखा नांदावा यासाठी प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमाला मेहकर नगर परिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येत साजरा केलेला हा इफ्तार कार्यक्रम सामाजिक एकात्मतेचे प्रतीक ठरला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेल्फ `अर पार्टी ऑफ इंडिया, मेहकर येथील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवर व नागरिकांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

### अखेर ठाकरेंचा नगरसेवक शिंदे सेनेत; मार्ग कोणी मोकळा केला? शिवसैनिक संतप्त

**कल्याण/प्रतिनिधी :** कारवाईचा कोणताही कलंक न लागताच कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीत उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मशाल चिन्हावर निवडून येऊन तात्काळ शिवसेना (एकनाथ शिंदे) शिंदे गटाच्या कच्छपी लागलेल्या कल्याण पूर्वे तील नगरसेवक मधुर म्हात्रे यांच्यावर कोणताही कारवाईचा बडगा न उगारताच त्यांना सरळमार्गाने शिवसेना शिंदे गटात जाण्याचा मार्ग मोकळा करून दिल्याने ठाकरे गटातील कल्याण, डोंबिवलीतील शिवसैनिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## जिल्ह्यातील ५९ ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांसाठी पोटनिवडणूका जाहीर

### – नामनिर्देशन पत्र ७ ते १३ एप्रिल दरम्यान दाखल करता येणार
### – २८ एप्रिल रोजी मतदान – आदर्श आचारसंहीतेचे काटेकोर पालन करावे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ५९ ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या ग्रामपंचायतींमध्ये १७ मार्च २०२६ च्या मध्यरात्रीपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

आयोगाच्या आदर्श आचार संहीता त्या-त्या ठिकाणच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहणार आहे. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती, घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहीता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे : निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## २० टक्के सेसफंड योजनेतील लाभार्थ्यांनी २० मार्चपर्यंत कागदपत्रे सादर करा; जिल्हा परिषद प्रशासनाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सेसफंड योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांची निवड झाली आहे, त्यांनी संबंधित योजनाचे साहित्य खरेदी करून दि. २० मार्च २०२६ पर्यंत पंचायत समिती स्तरावर आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशसनाव्दारे करण्यात आले आहे.


समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा यांच्या २० टक्के सेसफंड योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी. विद्युत मोटार पंप तसेच ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांसाठी शिलाई मशीन पुरविण्याची योजना राबविण्यात येत आहे.


या योजनेसाठी पंचायत समिती स्तरावर प्राप्त अर्जांची छाननी करण्यात आली असून, पात्र व परिपूर्ण अर्जांची ईश्वर चिठ्ठी पद्धतीने दि. १२ मार्च २०२६ रोजी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा येथे अर्जदारांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या याद्या संबंधित पंचायत समितींना पाठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांची निवड झाली आहे, त्यांनी संबंधित योजनेचे साहित्य खरेदी करून दि. २० मार्च २०२६ पर्यंत पंचायत समिती स्तरावर आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

सादर करावयाच्या कागदपत्रांमध्ये जीएसटी बिल, प्रतिज्ञापत्र, स्थळ पाहणी अहवाल (साहित्यासह फोटो) तसेच इतर आवश्यक कागदपत्रांचा समावेश आहे. निर्धारित मुदतीत कागदपत्रे सादर केल्यास लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ मिळणे सुलभ होईल. विहीत मुदतीत देयके सादर करून कोणताही लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक गुलाब खरात, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रमोद यंडोले यांनी केले आहे.

## अनधिकृत रिक्षांवर परिवहन विभागाची कारवाई; स्क्रॅप मोहीमेत ५० पेक्षा अधिक रिक्षा जप्त

दैनिक आपला विदर्भ





**नंदूरबार/प्रतिनिधी : :** शहरात वाढत्या अनधिकृत रिक्षा वाहतुकीवर आळा घालण्यासाठी परिवहन विभागाने विशेष स्क्रॅप मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या मोहिमेत जवळपास ५० पेक्षा अधिक अनधिकृत रिक्षांवर कारवाई करण्यात येऊन त्या स्क्रॅप करण्यात आल्या.

परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना काही दिवसांपासून शहरात परवानगी नसलेल्या तसेच कागदपत्रे अपूर्ण असलेल्या रिक्षा मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहतूक करत असल्याच्या तक्रारी मिळत होत्या. या पार्श्वभूमीवर विभागाने शहरातील विविध भागात विशेष पथके तैनात करून तपासणी मोहीम सुरू केली.

या तपासणीदरम्यान अनेक रिक्षांकडे वैध परवाना, फिटनेस प्रमाणपत्र तसेच विमा नसल्याचे आढळून आले. त्यानंतर अशा रिक्षांवर तात्काळ कारवाई करत त्यांना जप्त करण्यात आले. पुढील प्रक्रियेनंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जवळपास ५० पेक्षा अधिक रिक्षा स्क्रॅप करण्यात आल्या.

या कारवाईमुळे शहरातील अनधिकृत रिक्षा वाहतुकीवर काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, परिवहन विभागाने सर्व रिक्षा चालकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून परवाना, विमा व इतर आवश्यक कागदपत्रे पूर्ण ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. भविष्यातही अशी मोहीम सातत्याने राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही विभागाने दिला आहे.

कारवाईवेळी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल नलावडे, अक्षय येवले, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमित तडवी आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संध्या जाधव उपथित होते.